एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना अंतर्गत माहिती, शिक्षण व संपर्क (IEC) कार्यक्रमाअंतर्गत राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण "सबला" योजनेवर आधारीत सखी-सहेली १० भागाची मालिका तयार करुन मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर दाखविण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. एबावि-२०१५/प्र.क्र.६६/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५

वाचा :- १) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजन, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे जा.क्र.एबाविसेयो/का-५/२५६/२०१५, दिनांक ०४.०२.२०१५ चे पत्र.

२) Directorate of Advertising & Visual Publicity (DAVP) Ministry of Information & Broadcastine Govt. of India New Delhi Letter No. F.No.२२२०४/११/०९-AV-१, dated १८.०४.२०१२ & F.No.२२२०४/११/०९-AV (Part-२) dated १८.०५.२०१२

प्रस्तावना :- सन २०१४-१५ या चालू आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने मंजूर केलेली एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना ही नवीन योजना २० जिल्हयांसाठी लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून मे. पद्मश्री प्रॉडक्शन्स् प्रा. लि. पुणे यांचेकडून Directorate of Advertising & Visual Publicity (DAVP) व DD SHYADRI MUMBAI यांचे मान्य दरानुसार राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला) योजनेवर आधारीत १० भागाची "सखी सहेली" मालिका तयार करुन मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर दाखविण्यास व त्यासाठी येणा-या रु.६४,४९,४६४/- (रुपये चौसष्ट लाख एकोणपन्नास हजार चारशे चौसष्ट फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता

शासन निर्णय :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत माहिती, शिक्षण व संपर्क (IEC) या निधी अंतर्गत केंद्र शासनाच्या Directorate of Advertising & Visual Publicity (Ministry of Information & Broadcastine) यांचे दरकरारानुसार व त्यांनी प्राधिकृत केलेल्या मे. पद्मश्री प्रॉडक्शन्स् प्रा. लि. पुणे यांचेकडून एकात्मिक बाल विकास सेवा योजनेशी संबंधित राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला) योजनेवर आधारीत १० भागाची "सखी सहेली" मालिका तयार करुन मुंबई दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर दाखविण्यास व त्यासाठी येणा-या रु.६४,४९,४६४/- (रुपये चौसष्ट लाख एकोणपन्नास हजार चारशे चौसष्ट फक्त) इतका निधी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना दरकरारातील दर, अटी, शर्ती व दर्जा तसेच विनिर्देश (Specification) च्या अधिन राहून उपलब्ध करुन देण्यास शासन मंजूरी देत आहे.

| Sr. No. | Particulars | Rates per episode Video (As per DAVP Rate Card) | Nos | Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Production cost per episode Video<br>**Telecast Timing**<br>7 a.m. to 9 a.m &<br>8 p.m. to 11 p.m.<br>(any half hour) | Rs.5,50,000/- | 10 | 55,00,000/- |
| 2. | Doordarshan Release Cost Per Episode<br>**Terrestrial – Rs.13,000/-**<br>**Satellite – Rs.11,000/-** | Rs.24,000/-<br>(Two Times per week) | 10 | 2,40,000/- |
| 3. | Total (1+2) | Rs.55,00,000/-<br>Rs.2,40,000/- | | 57,40,000/- |
| 4. | Service Tax @ 12.36% | Rs.7,09,464/- | | 07,09,464/- |
| | **Grand Total** | | | **64,49,464/-** |

(रुपये चौसष्ट लाख एकोणपन्नास हजार चारशे चौसष्ट फक्त)

२. यासाठी होणारा खर्च हा सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या नवीन योजनेअंतर्गत माहिती, शिक्षण व संपर्क (IEC) या बाबी अंतर्गत खालील लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवून त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

अ) ग्रामीण क्षेत्र :-

१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (११) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) केंद्र हिस्सा ९०% (२२३६ १५९८) ३१ सहाय्यक अनुदान

२) राज्य शासनाचा १०% हिस्सा - लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (१२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) राज्य हिस्सा १०% (२२३६ १६०४) ३१ सहाय्यक अनुदान

ब) नागरी क्षेत्र :-

१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (१३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (नागरी) केंद्र हिस्सा ९०% (२२३६ १६१३) ३१ सहाय्यक अनुदान

२) राज्य शासनाचा १०% हिस्सा - लेखाशिर्ष :- मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (१४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (नागरी) राज्य हिस्सा १०% (२२३६ १६२२) ३१ सहाय्यक अनुदान. या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागवून, त्याच लेखाशिर्षाखाली

खर्ची टाकण्यात यावा. याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ १११/व्यय-६, दिनांक ३०.०१.२०१५ व महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१२/प्र.क्र.४३६/का.६, दिनांक १९.०२.२०१५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. बा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ , मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सहायक संचालक (वित्त व लेखा), एबाविसेयो, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
महिला व बाल विकास विभाग, कार्यासन क्र.४ (अर्थसंकल्प)
निवड नस्ती (कार्या.६)

निर्गमित
दिनांक २३/०५/२०१५